UCI रोड वर्ल्ड चॅम्पिनयशिप, २०३२, पुणे शहराच्या आयोजकत्वासाठी Union Cycliste Internationale (UCI) यांना निविदा शुल्क (Bidding Fee) अदा करण्यासाठी निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: एसडी-१२०१२/१२/ई-१७१६७९०/२०२६/क्रीयुसे-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २५ ऑगस्ट, २०२६

संदर्भ: १. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, यांचे पत्र क्रं.क्रीयुसे/ UCI वर्ल्डचॅम्प/प्रस्ताव/२०२६-२७/का-६/२५०२, दि.१३.०८.२०२६ रोजीचे पत्र.

२. दि.१८.०८.२०२६ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय.

प्रस्तावना:-

सन २०३२ मधील UCI रोड वर्ल्ड चॅम्पिनयशिप या जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठेच्या सायकलिंग स्पर्धेच्या आयोजकत्वसाठी पुणे (महाराष्ट्र) शहराची उमेदवारी सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (CFI) व Pune Grand Tour आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आलेली आहे.

UCI रोड वर्ल्ड चॅम्पिनयशिप, २०३२ च्या निमित्ताने आशियातील पहिले यजमान पद भारताकडे येणार असल्याने सदर स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे ३३० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल अपेक्षित असल्याने याकरिता स्पर्धा संयोजनासाठी शासनाकडून समर्थनपत्र, आर्थिक हमी, पायाभूत सुविधा व कार्यान्वयन विषयक विविध बाबींना दि.१८.०८.२०२६ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

UCI रोड वर्ल्ड चॅम्पिनयशिप, २०३२ पुणे शहराच्या आयोजकत्वासाठी UCI कडे निविदा शुल्क (Bidding Fee) भरण्याकरीता निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

UCI रोड वर्ल्ड चॅम्पिनयशिप, २०३२ स्पर्धेच्या आयोजकत्वासाठी Union Cycliste Internationale (UCI) यांच्याकडे निविदा शुल्क भरण्यासाठी रु.३६.५० लक्ष (रुपये छत्तीस लक्ष पन्नास हजार फक्त) इतका निधी मंजूर करण्यास व निधी वितरणास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने होणारा खर्च “मागणी क्रमांक : ई-३, २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४-क्रीडा व खेळ (०२) क्रीडा स्पर्धा (०२)(०३) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत नोंदणीकृत क्रीडा संस्थांना सहाय्यक अनुदान (राज्य) (२२०४-१९४३), ३१ सहाय्यक अनुदाने” या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ मधील अर्थसंकल्पित तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. i) सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

ii) उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार व मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आहरित करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेवू नये.

iii) राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश / नियम /शासन निर्णय, वित्तीय नियमावली इत्यादीच्या अधीन राहून उपरोक्त तरतुद वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

iv) उपरोक्त खर्चाचा सविस्तर तपशिल तसेच उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करावे.

४. वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार वरील निधी खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपपचारीक संदर्भ क्रं.५२८/२०२६/व्यय-५, दि.१८.०८.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०८२५१२४५४८३२४२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KUNAL PRAKASH SARPATE

Digitally signed by KUNAL PRAKASH SARPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=E6A1F3D5C3AB992CD9199B6876A0D6ECA093BA0997B95C14B994911065E1850D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=83650EA2D9A8726AAC3D480F8E9314BAD245DE4B1C4CE60C4CF22C5148EAF108, cn=KUNAL PRAKASH SARPATE
Date: 2026.08.25 12:47:12 +05'30'

(कुणाल सरपाते)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४) मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.

६) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

८) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

९) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) - १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

११) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) जिल्हाधिकारी, पुणे.
१५) लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, पुणे.
१६) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
१७) वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का. १४७१), मंत्रालय, मुंबई-३२.
१८) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१९) निवड नस्ती (क्रीयुसे-२).